जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेसनोट क्रमांक :- दिनांक - २६/०६/२०२६

सुमारे ३९.०३ कोटी रूपये किंमतीचे व सुमारे ६०० किलो वजनाचे जप्त अंमली पदार्थ नाश केलेबाबत.

--------oo----------

विविध पोलीस कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल नाश करण्यासाठी केंद्र सरकारच्या कायदेशीर निर्देशांप्रमाणे सदरचा मुद्देमाल नाश करण्यात येत असतो. तसेच संपुर्ण देशभरात **'नशामुक्त भारत अभियान'** राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणुन दाखल गुन्हयात जप्त अंमली पदार्थ मुद्देमाल नाश करण्याचे मा.श्री. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे यांनी आदेश दिले होते.

त्यानुसार नशामुक्त भारत अभियान अंतर्गत २६ जुन जागतिक अंमली पदार्थ दिनाचे औचित्य साधून पोलीस आयुक्तालय, ठाणे अंतर्गत येणा–या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल ११२ गुन्हयांतील जप्त अंमली पदार्थ हा केंद्रीय मुद्देमाल नाश समितीचे अध्यक्ष मा.डॉ.श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, सदस्य मा.श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, सदस्या मा.श्रीम. मिना मकवाना, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय – १ ठाणे, मा. श्री. विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त,प्रति., गुन्हे शाखा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे व त्यांच्या पथकाने सर्व कायदेशीर सोपस्कर पुर्ण करून नाश केला आहे. सदर मुद्देमाल हा मुंबई वेस्ट मॅनेजेंट कंपनी, तळोजा एम.आय.डी.सी. नवी मुंबई येथे नाश करण्यात आला आहे.

नाश करण्यात आलेला मुद्देमाल :–

अंमली पदार्थाचे नाव	दाखल गुन्हे	जप्त मुददेमालाचे वजन	किंमत
गांजा	६६	५६४ किलो ६७४ ग्रॅम	१,१३,०५,०००/–
हायब्रिड गांजा	०२	८५५ ग्रॅम	८५,५०,०००/–
एम.डी.	२९	०६ किलो ७१५ ग्रॅम	१३,४३,००,०००/–
चरस	०७	२० किलो ९८२ ग्रॅम	२०,९८,२०,०००/–
कफसिरप	०७	१४६७ बॉटल्स	२,९३,४००/–
ब्राउन शुगर	०१	१०४ ग्रॅम	२०,८०,०००/–
एकुण	**११२**	**५९४ किलो ३३२ ग्रॅम १,४६७ कफ सिरप बॉटल**	**३९,०३,४८,४००/–**

वर नमुद कामगिरी मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे, मा. डॉ.पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, तथा मुद्देमाल समिती अध्यक्ष ठाणे, सदस्य मा.श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, सदस्या श्रीम.मीना मकवाना पोलीस उप आयुक्त, मुख्यालय–१, ठाणे, मा. श्री. विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रतिबंध) गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. जनार्दन सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली

(कृ.मा.प.)

पदार्थ विरोधी पथक, ठाणे, परिमंडळीय नोडल अधिकारी पोनि/गुन्हे विनोद पाटील, पोनि/गुन्हे चंद्रहास गोडसे, पोनि/गुन्हे जयपाल राजपुत, पोनि/गुन्हे संदिप धांडे, पोनि/गुन्हे संजय दवणे, सपोनि/सोमनाथ कर्णवर–पाटील, पोउपनि/दिपक डुम्मलवाड, पोउपनि/ राजेंद्र निकम, पोउपनि/मोहन परब, सहा. रासायनिक विश्लेषक, पोहवा/५७२९ हरीश तावडे, पोहवा/३७४५ अभिजीत मोरे,पोहवा/अमोल पवार, पोहवा/संदीप चव्हाण, पोहवा/नंदकिशोर सोनगिरे, पोहवा/६३३१ हुसेन तडवी, पोहवा/४२४८ अमोल देसाई, पोहवा/अमित सकपाळ, पोहवा/अजय सकपाळ, पोहवा/गिरीश पाटील, पोना/४८४७ अनुप राक्षे, मपोहवा/६८५२ शिल्पा कसबे, मपोशि/३४ कोमल लादे.

————००————